दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 7 मे 2026 | अंक क्र. 345 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# एसटी प्रवाशांना गंडा घालणाऱ्या विक्रेत्यांना मंत्री प्रताप सरनाईकांचा थेट इशारा: परवाने होणार रद्द

■ मुंबई: वृत्तसंस्था

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सवलतधारक प्रवाशांसाठी सुरू करण्यात आलेल्या एनसीएमसी (National Common Mobility Card) स्मार्ट कार्ड वितरणादरम्यान, काही विक्रेत्यांकडून प्रवाशांना जादा दराने कार्ड विक्री केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, अवाजवी दर आकारणाऱ्या विक्रेत्यांचे परवाने तात्काळ रद्द करण्यात येतील, असा थेट इशारा दिला आहे.**



## सवलतधारक प्रवाशांना डिजिटल पद्धतीने

■ सवलतींचा लाभ मिळावा यासाठी एसटी महामंडळाने एनसीएमसी कार्ड प्रणाली लागू केली आहे. यासाठी राज्यभरात ३००० हून अधिक अधिकृत विक्रेत्यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रमुख बसस्थानकांवरही ही कार्डे उपलब्ध करून दिली आहेत. नवीन कार्ड घेणाऱ्यांसाठी १९९ रुपये आणि जुन्या स्मार्ट कार्डधारकांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र, काही विक्रेतांकडून या दरांपेक्षा जास्त पैसे आकारून प्रवाशांची लूट केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.


## समंत्र्यांचा इशारा

■ या तक्रारींची दखल घेत मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले की, प्रवाशांकडून जादा पैसे घेणाऱ्या विक्रेत्यांची अजिबात गय केली जाणार नाही. ज्या परवानाधारक विक्रेत्यांकडून अशा प्रकारे अवाजवी दर आकारले जात आहेत, त्यांचे परवाने तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येतील. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, काही विक्रेत्यांचे परवाने यापूर्वीच रद्द करण्यात आले आहेत. एसटी महामंडळाने प्रवाशांना सवलती अधिक सुलभ आणि डिजिटल पद्धतीने देण्यासाठी एनसीएमसी कार्ड कार्यप्रणाली सुरू केली आहे. सध्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि 'अमृत' ज्येष्ठ नागरिक यांची नोंदणी व कार्ड वितरण सुरू आहे. लवकरच सर्व सवलतधारक प्रवाशांसाठी एसटी प्रवासात एनसीएमसी कार्ड वापरणे अनिवार्य केले जाईल. त्यामुळे प्रवाशांची सोय होण्याबरोबरच सवलतींचा अचूक लाभ मिळेल. एनसीएमसी कार्डद्वारे तिकीट वितरण, टॉप-अप आणि इतर व्यवहारांसाठी एकसंध मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली असून, ती काटेकोरपणे राबविण्याचे निर्देश सर्व आगार व्यवस्थापकांना देण्यात आले आहेत. या उपक्रमामुळे एसटी सेवा अधिक आधुनिक, पारदर्शक आणि प्रवासी-केंद्रित होणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# प्लेऑफचे ठिकाण झाले पक्के ; बीसीसीआयने दिली मोठी अपडेट

■ बेंगळुरु वृत्तसंस्था

: आयपीएल २०२६ आता अखेरच्या टप्पयात आहे. हंगामातील अखेरचा साखळी सामना २४ मे ला खेळला जाणारा आहे, तर आता बीसीसीआयकडुन महत्त्वाची अपडेट समोर आाली आहे. २०२६ चा फइनल सामना बेंगळुरुच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियम ऐवजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाणर आहे. आयपीएल २०२६ च्या प्लेऑफची सुरुवात २६ मे पासून होणार आहे.आयपीएल २०२५ च्या फाइनलमध्ये बेंगळुरुने पंजाबचा सहा धावांनी पराभाव करत पहिल्यांदा आयपीएलचे विजेतापद झळकवले होते. यामुळे आयपीएलच्या नियमानुसार गतविजेत्या टीमच्या घरच्या मैदानावर पुढच्या हंगामाचा अंतिम सामना खेळला जाईल, मात्र असं आता होणार नाही. यामुळे क्रिकेट वर्तृळात एकच खळबळ उडाली आहे.



### बेंगळुरुत सामना का नाही होणार ?

आयपीएलच्या नियमानुसार अंतिम सामना बेंगळुरुत खेळला जाणार होता.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने याबद्दल एक निवेदन दिले असून त्यामध्ये म्हटले, अंतिम सामना आयोजित करण्याची जबाबदारी बंगळुरुवर सोपवण्यात आली होती, पण स्थानिक संघटना आणि प्रशासकीय यंत्रणांकडून करण्यात आलेल्या मागण्या, या बीसीसीआयच्या नियमावलीच्या बाहेर होत्या ,त्यामुळे अंतिम सामन्याचे ठिकाण बदलण्यात आले आहे.

अंतिम सामन्याचे ठिकाण बद्दलण्याचे प्रमुख कारण आमदारांचा तिकीट वाद मानले जात आहे. आयपीएल २०२६ सुरु होण्यापूर्वी कर्नाटकाच्या आमदाराने मागणी केली होती, की आमदार हा लोकप्रतिनिधी असुन त्यांना तिकीटांसाठी रांगेत थांबवे लागु नये, यासाठी प्रत्येक आमदाराला अंतिम सामन्याची किमान पाच तिकीटं मिळावीत. या प्रकरणाची दखल घेत कर्नाटकाचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी चिन्नास्वामी स्टेडियमवर होणाऱ्या प्रत्येक सामन्याची तीन तिकीटे देणार असे जाहीर केले होते , म्हणून आता चिन्नास्वामी स्टेडियामवर अंतिम सामना होणार नसल्याचे बीसीसीआयने जाहीर केले.


आयपीएल २०२६ अंतिम सामना आणि प्लेऑफ सामन्यांचे वेळापत्रक- क्वालिफायर १ – २६ मे २०२६, धर्मशाला एलिमिनेटर – २७ मे २०२६, चंदीगड क्वालिफायर २ – २९ मे २०२६, चंदीगड अंतिम सामना – ३१ मे, २०२६, अहमदाबाद.

# संगमनेरमध्ये खाकीचा मोठा दणका ! 70 लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त; तिघांना बेड्या

■ संगमनेर | प्रतिनिधी

नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावर स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि अन्न व औषध प्र शासनाने मंगळवारी मोठी कारवाई केली. हि वरगाव पावसा टोलनाक्याजवळ सापळा रचून तब्बल ६९ लाख ७९ हजार ४०० रुपये किमतीचा अवैध गुटखा आणि सुगंधी तंबाखू जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे आंतरराज्य गुटखा तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

नाशिकहून पुण्याकडे एका आयशर टेम्पोतून प्रतिबंधित मालाची मोठी खेप जात असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शा खेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अन्न व औषध प्रशासनाच्या पथ का स ह हिवरगाव पावसा टोलनाक्यावर




पाळत ठेवली. सकाळी ११:३० च्या सुमारास संश यि त आयशर टेम्पो (MH 43 BX 2779) येताना दिसताच पोलिसांनी तो अडवला.

### गुजरात कनेक्शन उघड

पोलिसांनी टेम्पोची झडती घेतली असता, त्यात गोण्यांमध्ये लपवून ठेवलेला मोठ्या प्रमाणावर गुटखा व तंबाखू मिळून आला. चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली असून, हा माल गुजरात राज्यातील वापी येथून भरण्यात आला होता आणि तो पुण्यातील निलेश ललवाणी नावाच्या व्यक्तीकडे पोहोचवला जाणार होता.

### मुद्देमाल आणि पुढील तपास

अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार यांच्या उपस्थितीत पंचनामा करून ७० लाखांचा माल व वाहन जप्त करण्यात आले आहे. संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅकेटमधील मुख्य सूत्रधारांचा शोध घेतला जात आहे.

# तामिळनाडूत सत्तेचा 'क्लायमॅक्स'!

## विजय यांचा सत्तास्थापनेचा दावा, पण बहुमताचा आकडा अद्याप लांबच

■ चेन्नई | वृत्तसंस्था

तामिळनाडूच्या राजकारणात सध्या प्रचंड अस्वस्थता आ णि उत्सुकता पाहायला मिळत आहे. १० वर्षांची स्टॅलिन यांची सत्ता उलथवून लावल्यानंतर, अभिनेता विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कझगम' (TVK) पक्षाने सत्तास्थापनेच्या हालचाली वेगवान केल्या आहेत. बुधवारी (६ मे) विजय यांनी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेऊन सत्तास्थापनेचा दावा केला, मात्र तांत्रिक गणितांमुळे बहुमताचा पेच अद्याप सुटलेला नाही.





■ **राजभवनात काय घडले?**

विजय यांनी राज्यपालांना ११२ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र दिले. यामध्ये TVK चे १०७ आणि काँग्रेसच्या ५ आमदारांच्या सह्यांचा समावेश आहे. मा त्र, तामिळनाडू विधानसभेच्या एकूण २३४ जागांपैकी सत्तेसाठी ११८ हा जादूचा आकडा गाठणे आवश्यक आहे. राज्यपालांनी विजय यांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की, "आधी ११८ आमदारांच्या पाठिंब्याचे अधिकृत पत्र द्या, मगच पुढील प्रक्रिया होईल. जादूच्या आकड्यासाठी ६ आमदारांची ओढाताण विजय यांच्या पक्षाला निवडणुकीत १०८ जागा मिळाल्या हो त्या , मात्र खुद्द विजय दोन जागांवरून निवडून आल्या ने त्यांना एक जागा सोडावी लागणार आहे. त्यामुळे सध्या त्यांच्याकडे १०७ आमदार आहेत. काँग्रेसच्या ५ आमदारांच्या पाठिंब्यानंतरही त्यांना आणखी ६ आमदारांची गरज आहे. यासाठी विजय यांना आता खालील पक्षांकडे डोळे लावून बसावे लागणार आहे

## शपथविधीची तयारी की औपचारिकता ?

■ **एकीकडे चेन्नईच्या नेहरू स्टेडियमवर शपथविधी सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे, तर दुसरीकडे कायदेशीर पेच कायम आहे. १० मे रोजी विधानसभेची मुदत संपत आहे. त्यापूर्वी विजय यांना बहुमत सिद्ध करावे लागेल.**

## कायदेतज्ज्ञांचे मत

■ **जर १० मे पूर्वी बहुमताचे पत्र देता आले नाही, तर राज्यपाल विजय यांना मुख्यमंत्री म्हणून शपथ देऊन १५ दिवसांत विधानसभेत विश्वासदर्शक ठराव जिंकण्याची संधी देऊ शकतात. स्टॅलिन यांच्या पराभवानंतर तामिळनाडूने नवा नेता निवडला आहे, मात्र 'थलापती' विजय या राजकीय परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात पास होणार का? याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.**

# नसरापूर घटनेतील आरोपीकडून संतापजनक कबुली

■ पुणे वृत्तसंस्था

पुणे जिल्ह्यामधील भोर तालुक्यातील नसरापूरमध्ये चिमुकलीवर झालेल्या संतापजनक प्रकार आणि नंतर तिला संपवल्याच्या घटनेनं संपूर्ण पुणे जिल्ह्यासह अखखा महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणामुळे नागरिकांचा संताप वाढत असताना पुणे पोलिसांनी तपास आता अधिक वेगाने सुरू केला आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्धचे सर्व पुरावे अन् खडानखडा माहिती गोळा केले असून आता फास्ट ट्रॅक कोर्टात हे प्रकरण चालवणार आहे. येत्या 10 दिवसात चार्जशीट दाखल होईल, अशी अपेक्षा आहे. आरोपीला घटनास्थळी नेऊन तपास दरम्यान, या प्रकरणातील आरोपी, नराधम भीमराव कांबळेला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी संपूर्ण महाराष्ट्रातून होत आहे.

या प्रकरणासंबंधित सखोल तपासासाठी पोलिसांनी आरोपीला घटनास्थळी नेले. यावेळी त्याने अनेक गोष्टींची कबुली दिली.घटनेच्यावेळी आरोपी कुठे उभा होता? त्याने नक्की कशाप्रकारे हा गुन्हा केला? या सर्व बारीकसारीक गोष्टींचा पंचनामा पोलिसांनी घटनास्थळी केला. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पोलिसांनी हा निर्णय घेतला अन् आरोपीला गोठ्यात नेलं होतं.



## संपादकीय

# उष्माघाताचे संकट!

यंदाचा उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ - ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९° सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली. नागपूर जिल्ह्यात बसने प्रवास करणाऱ्या ६५ वर्षीय प्रवाशाचा मृत्यू झाला, अशी उदाहरणे देता येतील. उष्णतेच्या लाटांमुळे शरीरातील पाणी कमी होणे (डिहायड्रेशन), उष्माघात आणि मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे, मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे आणि ऊन टाळून कामे करणे, हेच आपल्या हातात आहे. आरोग्य विभागाने दुपारी घराबाहेर न पडण्याचे, सुती कपडे वापरण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी हे संकट टळणारे नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम भारताच्या उन्हाळ्यावर होत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत असल्याने अनेक शहरात 'अघोषित संचारबंदी' अनुभवला मिळत आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकारची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल.



# भारतीय कम्युनिस्ट पक्ष बीड जिल्हा कौन्सिलच्या वतीने कार्ल मार्क्सच्या जयंतीदिनी क्रांतिकारी अभिवादन

**बीड प्रतिनिधी**

जगातील कामगारांनो एक व्हा या क्रांतिकारी घोषणेने एकोणिसाव्या शतकात जगभर भांडवलदारी वर्गाला हादरून टाकणाऱ्या कार्ल मार्क्स च्या साम्यवादी कृतिशील तत्त्वज्ञानाने क्रांती घडवून आणली त्या कार्ल मार्क्सचा जयंतीचे औचित्य साधून दिनांक 5 मे 26 रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष जिल्हा कौन्सिल बीड येथे पक्ष व समविचारी सामाजिक कार्यकर्त्यांनी क्रांतिकारी अभिवादन केले असल्याची माहिती पक्षाचे प्रसिद्धी प्रमुख कॉ तुकाराम पवार यांनी दिली आहे.



प्रथम कार्ल मार्क्स यांच्या प्रतिमेस महाराष्ट्र राज्य सचिव मंडळ सदस्य कॉम्रेड नामदेव चव्हाण व संपादक कॉम्रेड शेखर कुमार यांनी पुष्पहार अर्पण केला यावेळी उपस्थितीना मार्गदर्शन करताना कॉम्रेड नामदेव चव्हाण यांनी कम्युनिस्ट पक्ष केवळ एक पक्ष नसून तो एक विचार आहे जोपर्यंत जगात गरिबी दारिद्र्य भेदभाव शोषित शोषक वर्ग अस्तित्वात आहे तोपर्यंत सत्तेत असो वा नसो कम्युनिस्ट पक्षाचअस्तित्व असणार ज्यांच्यावर अन्याय होतो ज्यांची पिळवणूक होते त्यांना कम्युनिस्ट पक्षाशिवाय दुसरा पर्याय नाही हे अधोरेखित करून सांगितले तसेच कार्ल मार्क्सची आर्थिक परिस्थिती दयनीय असतानाही देखील नाही रे वर्गासाठी अतुलनीय विचारवंत म्हणून त्यांनी केलेले लेखन कार्य अमोल आहे. संपादक कॉम्रेड शेखर कुमार यांनी दास कॅपिटल या ग्रंथाचे वाचन व अभ्यास करण्याचे आवर्जून सुचविले आहे कॉम रंजना हुरकुडे प्रसंगोचित मनोगत व्यक्त केले

महाराष्ट्र राज्य किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य कॉम्रेड डी जी तांदळे यांच्या अध्यक्षतेखाली व पक्षाचे जिल्हा सरचिटणीस कॉम्रेड भाऊ प्रभाळे राज्य राज्य कौन्सिल सदस्य कॉम्रेड रंजना हुरकुडे किसान सभेचे जिल्हा सेक्रेटरी कॉम्रेड ज्योतीराम हुरकुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास ज्येष्ठविधीज्ञ हा कॉम्रेड भीमराव चव्हाण कॉ. तुकाराम पवार-ठाकूर, मुख्याध्यापक कॉम्रेड विनोद सवासे, लाडकी लेक अभियान चे जिल्हा समनव्ययक व एकल महिला संघटनेत कार्यरत सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे धम्मा देवडे आयुब खान पठाण अलीम इनामदार शकील फारुकी मोहन वायकर अखिल शेख सलीम शेख गणेश गाडे युसुफ शेख आबरा शेख बाळू गाडे यांच्यासह पुष्कळ कार्यकर्ते उपस्थित होते सभेचे संचालन जिल्हा सेक्रेटरी कॉ भाऊ प्रभाळे यांनी केले तर आभार किसान सभेचे जिल्हा सरचिटणीस कॉ ज्योतीराम हुरकुडे यांनी मांडले.

# महापालिकेतील निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी एआयचा वापर करा : मंत्री अॅड आशिष शेलार

**मुंबई : वृत्तसंस्था**

महापालिकेची निविदा प्रक्रिया मानवी हस्तक्षेप शुन्य होऊन ती अधिक पारदर्शक होईल, निवेदेतील व्हेरिएशनवर लक्ष राहिल, कामाची अंमलबजावणी प्रभावी होईल, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करा, असे निर्देश मुंबई उपनगर पालकमंत्री तथा इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धीमता विभाग अॅड.आशिष शेलार यांनी आज दिले.

राज्याच्या कृत्रिम बुध्दीमता धोरणाला राज्य मंत्री मंडळाने मंजूरी दिली असून त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धीमता विभागाने काम करण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर आज मंत्री अॅड. यांनी मुंबई महापालिका आणि इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धीमता विभागाची संयुक्त बैठक सह्याद्री अतिथीगृहावर घेतली. या बैठकीला महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, महाआयटीचे संचालक संजय काटकर, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संचालिका भूवनेश्वरी यांच्यासह महापालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुंबई महापालिका दैनंदिन कामकाजात एआयचा वापर कशा पध्दतीने करते आहे याचे सादरीकरण महापालिकेतर्फे करण्यात आले. नालेसफाईमध्ये पारदर्शकता यावी म्हणून तसेच नागरी सेवांमध्ये पारदर्शक व गतीमानता यावी म्हणून एआयचा वापर करण्यात येत असल्याचे सादरीकरण करण्यात आले. नागरिकांच्या तक्रारी चँट बाँट या एआय तंत्रज्ञानामार्फत मार्फत विभाग कार्यालयात संकलित करण्यात येत असल्याचे पालिकेने सांगितले. मात्र यामध्ये एआयचा वापर करुन अधिकची सुधारणा करा व कोणत्याही महापालिका कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची तक्रार त्याने बोलल्यानंतर तो व्हिडीओ रेकॉर्ड होऊन तो व्हिडीओ संबंधित विभागकडे जाईल व त्यावर कारवाई तातडीने कारवाई अथवा कार्यवाही होईल, कशा पध्दतीने नियोजन करा. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्या पद्धतीने मंत्रालयात ई फाईल व ई स्वाक्षरी ची संकल्पना प्रभावीपणे राबवली आहे त्याच पध्दतीने मुंबई महापालिकेत ही संकल्पना राबवा व पेपरलेस कारभाराच्या दृष्टीने कामकाज होईल याचे नियोजन करा. तसेच टेंडर पद्धतीमध्ये पारदर्शकता येणे आवश्यक आहे. महापालिका टेंडर मध्ये अनेक वेळा व्हेरिएशन केले जाते त्यावर एआय नियंत्रण आणा, जेणेकरून नागरिकांना अशा पध्दतीने झालेल्या कामांची माहिती मिळू शकेल तसेच व्हेरिएशनमध्ये करण्यात आलेला निर्णय योग्य आहे की नाही हे एआय मार्फत स्पष्ट होईल अशा पध्दतीचे नियोजन करा, अशा सूचना मंत्री अॅड. शेलार यांनी केल्या. दरम्यान, महापालिकेच्या कामकाजात नागरिक सहभागीता वाढावी व तरुणांच्या नवनवीन कल्पना समजून त्याचा वापर प्रशासनामध्ये करता यावा यासाठी तरुणांची हे हँकेथॉन आयोजित करा, असेही मंत्री शेलार यांनी सूचित केले.



# बीड पंचायत समितीचे नूतन गटशिक्षणाधिकारी भगवानराव सोनवणे यांचा शिक्षक संघाकडून भव्य सत्कार

**बीड | प्रतिनिधी**

बीड पंचायत समितीचे नूतन गटशिक्षणाधिकारी मा. भगवानराव सोनवणे यांचा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सोनवणे साहेबांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

या सत्कार सोहळ्यास शिक्षण विस्तार अधिकारी सिद्धेश्वर माटे, जिल्हाध्यक्ष भगवान पवार, बीड तालुकाध्यक्ष बंडू घोरड, जिल्हासंघटक बप्पासाहेब देवगुडे, कार्यकारी अध्यक्ष सुभाष वीर, जिल्हाउपाध्यक्ष परमेश्वर बिडवे, जिल्हाप्रवक्ते महादेव घोडके, तालुका उपाध्यक्ष जीवन हाडळे तसेच संजय वागुले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी समन्वयाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमात शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सोनवणे साहेबांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार केला. संपूर्ण कार्यक्रम आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# क्षेत्ररक्षणातला ढिसाळपणा भोवला, पंजाब किंग्सचा पराभव; सनरायझर्स हैदराबादचा विजय

**पंजाबने हैदराबादला अव्वल स्थान केले बहाल**

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

२२०+ धावा उभारल्यानंतर विजय पक्का, हे समीकरण सनरायझर्स हैदराबादने कायम राखले. इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मध्ये पंजाब किंग्सचा पराभव करून सनरायर्झसने गुणतालिकेत १४ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. पंजाब किंग्जची मक्तेदारी मंगळवारी संपुष्टात आली आणि आता प्ले ऑफची शर्यत अधिक रंगतदार झाली आहे. हैदराबादने आज तिन्ही आघाड्यांवर वर्चस्व गाजवले, तेच पंजाबला ३ झेल सोडणे महागात पडले. आता प्ले ऑफची शर्यत आणखी चुरशीची झाली आहे. कूपर कॉनलीने खणखणीत शतक झळकावले, परंतु पंजाबला विजय मिळवून देण्यासाठी त्याची एकट्याची झुंज कामी नाही आली.

पंजाब किंग्जच्या गचाळ क्षेत्ररक्षणाचा फायदा हैदराबादच्या फलंदाजांनी पुरेपूर उचलला. तीन सोपे झेल व एक स्टम्पिंग गमावल्याचा पंजाबला संपूर्ण सामन्यात पश्चाताप झाला. अभिषेक शर्माने १३ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ३५ धावांची आक्रमक खेळी केली आणि त्याला ट्रॅव्हिस हेड ( १९ चेंडूंत ३८ धावा) याची साथ मिळाली. दोन्ही सलामीवीर माघारी परतल्यानंतर पंजाबला डोकं वर काढण्याची संधी होती, परंतु शशांक सिंग, कूपर कॉनली व ल्युकी फर्ग्युसन यांनी सोपे झेल टाकले. मिळालेल्या संधीचं सोनं करताना इशानने ३२ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ५५ धावा केल्या. इशान व हेनरिच क्लासन यांनी ४८ चेंडूंत ८८ धावांची भागीदारी केली.

क्लासनने मोर्चा सांभाळताना ४३ चेंडूंत ३ चौकार व ४ षटकारांसह ६९ धावा केल्या, त्याच्यासोबत नितीश कुमार रेड्डीने ३२ चेंडूंत ६३ धावा जोडल्या. नितीश १३ चेंडूंत २ चौकार व २ षटकारांसह २९ धावांवर नाबाद राहिला आणि हैदराबाद ४ बाद २३५ धावांपर्यंत पोहोचला. पंजाबने या पर्वात पाच सामने लक्ष्याचा पाठलाग करताना जिंकले असले तरी हैदराबादने १० वेळा २२० हून अधिक धावा केल्या आणि त्यांना एकही हार पत्करावी लागली नाही. आजच्या डावात SRH ने मारलेले १७ षटकार ही देखील PBKS विरुद्ध त्यांची सर्वाधिक संख्या आहे.

पंजाब किंग्जची सुरुवात काही खास झाली नाही आणि प्रियांश आर्य ( १) व प्रभसिमरन सिंग ( ३) हे दोन्ही सलामीवीर अनुक्रमे इशान मलिंगा व पॅट कमिन्सच्या गोलंदाजीवर बाद झाले. हैदराबादच्या क्षेत्ररक्षकांनी सुरेख झेल टिपले. श्रेयस अय्यरही ( ५) स्वस्तात माघारी परतल्यानं पंजाबची अवस्था ३ बाद २३ अशी झालेली. मार्कस स्टॉयनिस व कूपर कॉनली यांनी ४० धावांची भागीदारी करून पंजाबचा डाव सावरला होता. पण, शिवांग कुमारने ही जोडी तोडली. स्टॉयनिस १४ चेंडूंत २८ धावांवर बाद झाला. पंजाबला १० षटकांत ४ बाद ९१ धावा करता आल्या होत्या आणि त्यांना ६० चेंडूंत १४५ धावा करायच्या होत्या. सूर्याश शेडगेला ( २५) आज मोठी खेळी करून मैदान गाजवण्याची संधी होती, परंतु पॅट कमिन्सच्या अनुभवासमोर तो अपयशी ठरला. आखुड चेंडूवर पुल शॉट मारण्याच्या प्रयत्नात तो झेलबाद झाला. PBKS चे विकेटसत्र कायम राहिले आणि शशांक सिंग ( ४) अपयशी ठरला. कूपर कॉनली एकटा खिंड लढवताना दिसला आणि त्याने अर्धशतकही पूर्ण केले, परंतु पंजाबच्या विजयासाठी त्याची झुंज पुरेशी नव्हती.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# " सिकची रिसॉर्ट " वलगाव येथे मिशन आयएएस शिबीराचे आयोजन















**अमरावती | प्रतिनिधी**

येत्या 16 मे ते 22 मे या कालावधीत अमरावती जिल्ह्यातील वलगाव येथे असलेल्या भव्य अशा सिकची रिसॉर्टमध्ये मिशन आयएएसचे राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा संस्कार शिबीर संपन्न होणार आहे. श्री प्रेम किशोर सिकची यांनी त्यांच्या ट्रस्टतर्फे हे शिबिर घेण्यासाठी सिकची रिसॉर्ट ही वास्तू विनामूल्य उपलब्ध करून दिली आहे. अमरावतीची सुप्रसिद्ध डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी व श्री प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने व अमरावतीच्या त्रिवेणी फाउंडेशनच्या सहकार्याने या राष्ट्रीय शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरामध्ये आयएएस तसेच इतर सर्व स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव श्री विकास खारगे अमरावती विभागाचे डीआयजी श्री रामनाथ पोकळे नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सत्यम गांधी खासदार डॉ. अनिल बोंडे महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक श्री दिलीप स्वामी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री निकेतन कदम आयपीएस अधिकारी श्री सागर भामरे पोलीस उपायुक्त श्री श्याम घुगे अपर आयुक्त श्री राजेश खवले उपायुक्त श्री महेबूब कासार उपायुक्त श्री गजानन खानंदे खंडविकास अधिकारी श्री अभिषेक कासोदे अबुधाबीचे संशोधक प्रा.डॉ.चंद्रशेखर मुरादे यांना आमंत्रित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून आयएएस करू इच्छिणारे स्वतःचे व्यक्तिमत्व विकास करून घेऊ इच्छिणारे १०ते २० या वयोगटातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. या शिबिरात भाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंदणीसाठी प्रा. पल्लवी नरेशचंद्र काठोळे यांच्याशी

9823294326 किंवा श्री प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्टचे श्री सचिन माळकर यांच्याशी 7875713975 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

अमरावतीच्या डॉ. पंजाबराव देशमुख अकादमीचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असून त्यानिमित्त या शिबिराचे आयोजन केले आहे. एवढ्या मोठ्या रिसॉर्टमध्ये शिबीर आयोजित करून संयोजकांनी शिबिरार्थींची राहण्याची भोजनाची व प्रशिक्षणाची नाममात्र शुल्कात उत्तम व्यवस्था केलेली आहे. यापूर्वी मिशन आयएएसमध्ये महाराष्ट्राचे मुख्य सचिव श्री जे पी डांगे मुख्य सचिव श्री रत्नाकर गायकवाड अपर मुख्य सचिव श्री विकास खारगे मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. प्रवीण दराडे, प्रवीण परदेशी, विभागीय आयुक्त श्री भास्कर मुंडे, श्री दिनेश वाघमारे, डॉ.सुधीरकुमार गोयल, श्री सूर्यकांत जोग, श्री आरुमुगम, श्री मधुकर कोकाटे, श्री किशोर गजभिये, श्री रवींद्र जाधव, डॉ. पुरुषोत्तम भापकर, श्री मिलिंद म्हैसकर, श्रीमती मनीषा वर्मा, मनीषा म्हैसकर, डी. आर.बनसोड, शेखर गायकवाड, आस्तिक पांडे, किरण गिते, रामराव घाडगे, नवीनचंद्र रेड्डी, अश्विनी जोशी,सुरेश खोपडे,लक्ष्मीकांत देशमुख, महेश शुक्ला, राहूल रंजन महिवाल, कौस्तुभ दिवेगावकर, रामचंद्र कुलकर्णी, बारावी फेलचे नायक मनोजकुमार शर्मा या आयएएस आयपीएस अधिकाऱ्यांसह 373 आयएएस/आयपीएस व राजपत्रित अधिकारी तसेच सोळा विद्यापीठाचे कुलगुरू सहभागी झालेले आहेत.

डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीतर्फे फक्त एक रुपया प्रतिदिन इतक्या अल्प शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्गापासून स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण देण्यात येते. या शुल्कामध्ये पुस्तके तसेच टेस्ट सिरीज या विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात. या उपक्रमात महाराष्ट्रातील 24 जिल्ह्यातील 23 हजार 500 विद्यार्थी सहभागी झालेले आहेत. याशिवाय संस्थेने संपूर्ण भारतात 18000 स्पर्धा परीक्षा कार्यशाळा घेतल्या असून एवढ्या मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षा कार्यशाळा घेणारी ही भारतातील एकमेव संस्था आहे.

संस्थेने स्पर्धा परीक्षेवर एकंदर 73 पुस्तके प्रकाशित केली असून ठिकठिकाणी स्पर्धा परीक्षा शिबिरे घेऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून महाराष्ट्रातील 23 आयएएसचा आकडा हा 100 वर नेऊन पोहोचविला आहे .या कामात अकादमीचा सिंहाचा वाटा आहे. अकादमीमार्फत चालविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमात नाममात्र पन्नास रुपये एवढ्या अल्प शुल्कात विद्यार्थ्यांना अभ्यासिका व ग्रंथालयाची सोय करून देण्यात येते. त्याचप्रमाणे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची विनामूल्य व्यवस्था तसेच अति गरीब विद्यार्थ्यांना विद्यावेतन देखील देण्यात येते. अशा प्रकारची सुविधा देणारी ही भारतातील एकमेव अकादमी आहे.

या सात दिवसाच्या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांची माहिती याशिवाय मुलाखत तंत्र .ग्रुप डिस्कशन . सेवन हॅबिट्स. व्यक्तिमत्व विकास व आयएएस आयपीएस व राजपत्रित अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिल्या जाते. या शिबिरामध्ये यावर्षी आयएएस झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. याशिवाय या शिबिरात एक दिवस शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते त्यामध्ये विद्यार्थ्यांना कलेक्टर ऑफिस कमिश्नर ऑफिस पोलीस आयुक्त कार्यालय डीएसपी कार्यालय जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय मनपा आयुक्त कार्यालय तसेच 11 कोटी रुपयांचे स्पर्धा परीक्षा केंद्र या ठिकाणी नेण्यात येऊन त्या त्या आयएएस आयपीएस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येते.

संस्थेच्या या उपक्रमाला संपूर्ण भारतातून उत्कृष्ट प्रतिसाद असून महाराष्ट्राशिवाय 19 राज्यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी मिशन आयएएस अंतर्गत काम करीत आहे. संस्थेने आयोजित केलेल्या या कार्याला शिबिराला विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे अशी विनंती संस्थेच्या प्रसिद्धी पत्रकातून करण्यात आली आहे.

संपर्क-प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे संचालक, मिशन आयएएस अमरावती 9890967003

# साबलखेड येथे विकास कामे न करताच कोट्यवधी रुपयांची बिले उचलली

## विशेष पथकाची नियुक्ती करून सखोल चौकशी करण्याची भरत गाडे व ग्रामस्थांची मागणी

**आष्टी | प्रतिनिधी**

तालुक्यातील साबलखेड येथे विविध विकास कामे न करताच कोट्यावधी रुपयांची बोगस बिले उचलली असल्याची माहिती माहिती अधिकारात उघड झाली आहे. या संबंधी साबलखेड येथे शुक्रवार दिनांक 24 रोजी झालेल्या ग्रामसभा मध्ये प्रश्न विचारले असता ग्रामसेविका व सरपंच यांना एक ही उत्तर देता आले नाही. त्यामुळे त्यांनी ग्रामसभा आटोपती घेऊन पळ काढल्याने ग्रामस्थांनी त्यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून निषेध केला. सदरील बोगस बिले उचलणाऱ्या अधिकारी कर्मचारी व संबंधितावर कारवाई करून गुन्हे दाखल करण्याची मागणी भरत गाडे व ग्रामस्थांनी बुधवार दिनांक - 06 मे 2026 रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती आष्टी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



कराळे वस्ती येथील जि प शाळेत पेव्हिंग ब्लॉक बसवणे (1,80,000/-), साबळेवस्ती व कराळेवस्ती जि प शाळेस कलर करणे (1,89,768/- ), ग्रामपंचायतसाठी फर्निचर खरेदी करणे (2,00,000/-), जिल्हा परिषद शाळा साबलखेड डिजिटल करणे (1,00,000/-), अंगणवाडी खेळणी खरेदी करणे (1,35,643/-), अंगणवाडी साठी साहित्य खरेदी करणे (76,690/-), हॅन्ड वॉश स्टेशन साबलखेड (1,50,000/-), ग्रामपंचायत साबलखेड येथे कॉम्प्युटर्स बॅटरी व इन्व्हर्टर खरेदी करणे (1,88,000/- ), कराळेवस्ती व साबळेवस्ती येथे जि प शाळेस कलर करणे (1,87,764/-), साबलखेड येथे ग्रामपंचायत अंतर्गत सोलर खरेदी (1,00,000/-), अंगणवाडी साहित्य खरेदी (79,790/-), ग्रामपंचायत अंतर्गत गावात एलईडी खरेदी करणे (80,000/-), अंगणवाडी इमारत दुरुस्ती करणे (1,74,073), आपले सरकार सेवा केंद्र साबलखेड (1,57,929/-), साबलखेड ग्रामपंचायत अंतर्गत सिमेंट बेंच बसवणे (74,476/-), झेरॉक्स मशीन खरेदी (65,000/-), श्रीराम कन्स्ट्रक्शन च्या नावे बिल आदा केले (2,52,021/-), साई इंटरप्राईजेस च्या नावे बोगस बिल काढले (2,43,000/-), उत्कर्ष शिवाजी ओंकार च्या नावे बोगस बिल काढले (2,21,841/-), घनकचरा व्यवस्थापनासाठीचा खर्च (2,00,457/-), मुस्लिम कब्रस्तान मध्ये पेव्हिंग ब्लॉक न बसवताच बिल काढले (4,44,449/-), जिल्हा परिषद शाळेच्या ग्राउंड वरील खर्च (प्ले ग्राउंड 6,45,024/-), साबलखेड गावासाठी तीन पाणीपुरवठा योजना कार्यान्वित असून गावात पाणीपुरवठा होत नाही (64,10,773/-) असे कोट्यावधी रुपयाचे बील उचललेले आहेत.

वरील सर्व विकास कामाचे विशेष पथकाची नियुक्ती करून सखोल चौकशी करावी व ग्रामपंचायतने मूलभूत सुविधा व भौतिक सुविधेवर खर्च न करता रंगरंगोटी, आवश्यक खरेदी दाखवून बोगस बिले उचलण्यात आलेली आहेत, काही कामावर डबल खर्च दाखवून पैसे उचलण्यात आलेले आहेत. सरपंच व ग्रामसेविका यांनी संगनमताने भ्रष्टाचार केल्याचा आरोप भरत गाडे व गावातील 30 ग्रामस्थांच्या सहिने गटविकास अधिकारी आष्टी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



# जिल्हा प्रशासनाच्या दिरंगाईचा 'हाहाकार' उडणार

## शेतकऱ्यांच्या पीक विम्यासाठी 22 मे रोजी तहसील कार्यालयावर धडक मोर्चा!

**महागाव:** जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला असतानाच, प्रशासकीय दिरंगाईमुळे हजारो शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी पीक विमा कंपनीला अपूर्ण माहिती दिल्याचा खळबळजनक आरोप करत जन आंदोलन आधार संघर्ष समिती आता आक्रमक झाली आहे. येत्या २२ मे २०२६रोजी महागाव तहसील कार्यालयावर 'हाहाकार मोर्चा' काढण्याचा इशारा संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी दिला आहे.

यवतमाळ जिल्ह्यात अतिवृष्टीने केवळ पिकेच नाही, तर सुपीक जमीनही वाहून गेली आहे. जमिनीला पडलेले उभे चर आणि फुटलेले बांध पाहून शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. मात्र, या संकटकाळात आधार देण्याऐवजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विमा कंपन्यांना योग्य माहिती न गेल्याने विम्याची रक्कम अडकून पडली आहे. खरीप हंगाम तोंडावर असताना बियाणे आणि खतांसाठी पैसे नसल्याने शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे.

नांदेड जिल्ह्याप्रमाणेच यवतमाळमधील शेतकऱ्यांनाही तातडीने भरघोस आर्थिक मदत आणि पीक विम्याचे वाटप करण्यात यावे, अशी ठाम मागणी समितीने केली आहे. "प्रशासनाच्या आडमुठेपणामुळे शेतकरी देशोधडीला लागला असून, आता शेतकऱ्यांचा संयम सुटल्याने शेतकऱ्यांच्या हक्कासाठी जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या वतीने दिनांक २२ मे २०२६, शुक्रवार रोजी हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत हाहाकार मोर्चाचे आयोजन करणार असून

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अस्तित्वाची ही लढाई असून, आता सरकार आणि प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

विम्याच्या लाभ मिळण्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनी या हाहाकार मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन जनआंदोलन आधार संघर्ष समितीचे अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी केले आहे.

*अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले त्यामुळे त्यांना विम्याचा लाभ मिळणे अपेक्षित असताना जिल्हाधिकारी यांच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांना विमा मिळण्यापासुन वंचित राहावे लागले.लगतच्या नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात शेतकऱ्यांना विमा मिळावा याकरिता पाठपुरावा केला त्याची फलश्रुती म्हणुन हजारो कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांना मिळाली. परंतु आपल्या जिल्हाधिकाऱ्यांना शेतकऱ्यांचे कोणतेच सोयर सुतक नसल्याने त्यांनी याकडे दुर्लक्ष करून शेतकऱ्यांना आर्थिक संकटात ढकलण्याचे काम केले आहे जोशी अधिकाऱ्यावर कारवाई करून शेतकऱ्यांना तात्काळ भरघोस मदत मिळाली पाहिजे अन्यथा हाहाकार मोर्चाद्वारे शेतकऱ्यांच्या मागण्या घेऊन रस्त्यावर उतरू.*

*जगदीश नरवाडे (संस्थापक अध्यक्ष जनआंदोलन आधार संघर्ष समिती)*



# महावीर इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांचा रायफल शुटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये अंतरराष्ट्रीय स्तरावर डंका

**आष्टी :** आष्टी तालुक्यातील कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचालित महावीर इंग्लिश स्कूल या सी बी एस ई बोर्ड मान्यताप्राप्त शाळेच्या विद्यार्थ्यांनी थायलंड (बँकॉंग) येथे झालेल्या अंतरराष्ट्रीय एअर रायफल शुटिंग चॅम्पियनशिप मध्ये प्रणिता गायकवाड (इयत्ता सहावी) सुवर्णपदक, संस्कृती बोबडे (इयत्ता-सहावी) सुवर्णपदक आणि आरशान सय्यद - ( इयत्ता - सातवी) सुवर्णपदक या तिन्ही विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक जिंकून शाळेचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचून आपल्या भारत देशाचे नाव रोशन केले आहे. या विद्यार्थ्यांना त्यांचे क्रीडा शिक्षक अहेमद पठाण आणि वैशाली शिंदे यांनी मार्गदर्शन केले.त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरी बद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री अमित राठोड उपाध्यक्ष- श्री. संदिप चानोदीया, सचिव - श्री. हेमंत मेहेर, कोषाध्यक्ष- डॉ. प्रमोद भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री मनीष गांधी, श्री. प्रकाश श्रीश्रीमाळ, श्री. अमोल पटवा, श्री. संजय पितळे, श्री. संतोष गांधी, लव कुमार (अध्यक्ष- एअर गण असोसिएशन ऑफ इंडिया) ,मुख्याध्यापक - श्री अभिलाष के. के, सल्लागार श्री मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, गुरूवार 7 मे 2026
Last page

# परळीत धक्कादायक घटना: उपचारात अक्षम्य हलगर्जीपणा !

## गर्भातील बाळाचा मृत्यू, तब्बल 22 तास मृत भ्रुण ठेवले पोटात; मातेच्या जीवावर बेतले; डॉक्टरांविरोधात तक्रार

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी):**

शहरातील एका खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांच्या उपचारातील हलगर्जीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. त्याचबरोबर या हृदयद्रावक घटनेनंतरही गांभीर्य न घेता केवळ अर्थिक लाभ उठविण्याच्या उद्देशाने या गरोदर मातेच्या पोटात तब्बल २२तास मृत भ्रुण ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या डॉक्टरच्या हलगर्जीने बाळ तर दगावलेच पण त्यानंतर या बाळाच्या मातेची प्रचंड हेळसांड करुन तिच्याही जीवाशी खेळ केल्याचा अमानवी व वैद्यकीय क्षेत्राला डाग लावणारा गंभीर लज्जास्पद प्रकार या डॉक्टरांनी केला आहे. याप्रकरणी संबंधित डॉक्टरां विरोधात शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून कर्तव्यात कसूर, बाळाच्या मरणास कारणीभूत व मातेच्या जीवाशी खेळण्याच्या अघोरी प्रकाराची सखोल चौकशी करून कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी मागणी करण्यात आली आहे.

या हृदय पिळवटून टाकणाऱ्या व धक्कादायक प्रकारानंतर वैजनाथ संभाजी मुंडे यांनी पोलीसांत धाव घेऊन गित्ते हॉस्पीटलच्या डॉ. कल्पना सचिन गित्ते यांच्याविरुद्ध कायदेशीर तक्रार दाखल केली आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या पत्नीवर गेल्या काही महिन्यांपासून संबंधित डॉक्टरांकडे उपचार सुरू होते. २३ एप्रिल रोजी अचानक पोटदुखीचा त्रास सुरू झाल्यानंतर त्यांनी डॉक्टरांशी संपर्क साधला. डॉक्टरांनी तातडीने दवाखान्यात येण्यास सांगितले. मात्र, रुग्णालयात दाखल केल्यानंतरही योग्य वेळी तपासणी व उपचार करण्यात आले नाहीत. तसेच, सोनोग्राफीसाठी बाहेरील केंद्रावर पाठविण्यात आले. तेथे झालेल्या तपासणीनंतर गर्भातील बाळाची स्थिती गंभीर असल्याचे सांगण्यात आले. तरीही रुग्णालयात वेळेत आवश्यक वैद्यकीय निर्णय न घेता विलंब करण्यात आला. दरम्यान, उपचाराच्या नावाखाली वारंवार पैसे मागण्यात आले.प्रचंड अर्थिक शोषण करण्यात आले.







डॉक्टरांच्या अक्षम्य दुर्लक्ष व हलगर्जीमुळे गर्भातील बाळाचा मृत्यू तर झालाच परंतु गरोदर मातेच्या जीवाशीही खेळण्याचा प्रकार या डॉक्टरांनी केला. मृत बाळ पोटात असतांना ते काढण्यासाठीची प्रसुती प्रक्रिया करण्यासाठी तब्बल २२ तास लावले ही अतिशय गंभीर बाब असुन या मातेच्या जीवाशीच खेळण्याचा प्रकार केवळ अर्थिक फायदा उचलण्यासाठी करण्यात आलेला आहे. या घटनेमुळे तक्रारदार कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या संपूर्ण प्रकरणात संबंधित डॉक्टरांनी निष्काळजीपणा करून रुग्णाच्या जीवाशी खेळ केल्याचा आरोप करत, दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. तसेच, या प्रकरणाची वैद्यकीय व कायदेशीर चौकशी करून सत्य समोर आणण्याची मागणीही करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाने तक्रार प्राप्त झाल्याची पुष्टी केली असून पुढील तपास सुरू असल्याचे सांगितले आहे.

### ■ जिल्हा शल्य चिकित्सकांकडेही न्यायाची मागणी

दरम्यान, या धक्कादायक व अमानवी कृत्याची चौकशी करावी व वैद्यकीय उपचाराच्या नावाखाली आर्थिक शोषण, मानसिक त्रास आणि नागरिकांच्या जीवाशी होणारा खेळ थांबवावा अशी मागणी करण्यात आली आहे. अतिशय गंभीर असा हा प्रकार पवित्र समजल्या जाणाऱ्या वैद्यकीय क्षेत्राला डाग लावणारा आहे.यापुर्वीही सोनपेठ तालुक्यातील एका महिलेच्या बाबतीतही याच डॉक्टरांनी असाच प्रकार केल्याचे समोर आले आहे.केवळ अर्थिक लाभ उठविण्यासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार वारंवार घडत असुन याबाबत वैजनाथ संभाजी मुंडे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांची भेट घेऊन तक्रार दाखल केली आहे.या प्रकरणी आता सखोल चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# आष्टीचा जावई मुंबईचा फौजदार; तुषार तरटे यांचा नागरी सत्कार, यशाचे सर्वत्र कौतुक

## नोकरी सांभाळत मिळवलेले यश प्रेरणादायी-माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे

**आष्टी प्रतिनिधी** : नोकरी करत असताना पोलिस खात्याअंतर्गत परीक्षा देऊन उल्लेखनीय यश संपादन करणारे तुषार तरटे यांची मुंबई पोलिस दलात पोलिस उपनिरीक्षक (फौजदार) पदावर निवड झाल्याने आष्टी तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. “आष्टीचा जावई मुंबईचा फौजदार झाला, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे,” असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांनी केले.




येथील शहादेव धोंडे यांचे जावई तुषार तरटे यांनी कठोर परिश्रम व जिद्दीच्या जोरावर पोलिस उपनिरीक्षक परीक्षेत यश मिळवले. त्यांच्या या यशाबद्दल मंगळवार (दि.५) रोजी सायंकाळी ७ वाजता माळीवाडा येथे नागरिकांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. या वेळी रंगनाथ धोंडे बोलत होते.

कार्यक्रमास उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, नगरसेवक सुरेश वारंगुळे, नगरसेवक भारत मुरकुटे, अक्षय धोंडे, बबन कदम, संदीप धोंडे, सुरज रोकडे, विजय धोंडे, उमेश धोंडे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे बोलताना रंगनाथ धोंडे म्हणाले की, “नोकरी सांभाळत स्पर्धा परीक्षा देऊन मिळवलेले हे यश अत्यंत कौतुकास्पद आहे. तुषार तरटे यांनी आपल्या सेवाकाळात गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे काम करावे,” अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.तुषार तरटे यांच्या या यशामुळे परिसरातील तरुणांना प्रेरणा मिळत असून, स्पर्धा परीक्षांकडे वळण्याचा सकारात्मक संदेशही या निमित्ताने समाजात पोहोचत आहे.



**संभाजी ब्रिगेडचे देवराव लुगडे महाराज यांची कन्या डॉ पूजा हिचा विवाह गोपाळ शिंदे यांच्याशी टाकळी देशमुख येथे बुधवार दिनांक ६ रोजी रोजी संपन्न झाला या प्रसंगी शुभेच्छा देताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या बीड जिल्हा, महिला अध्यक्षा श्रीमती नसरीन बागवान, परळी नगर परिषदेचे मा. नगराध्यक्ष बाजीरावभैय्या धर्माधिकारी, माजी नगरसेवक राजेंद्र सोनी, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा कोषाध्यक्ष आणि पुण्य नगरीचे प्रतिनिधी धनंजय आरबूने, फुले- आंबेडकरी अभ्यासक तथा पत्रकार इंजि. भगवान साकसमुद्रे,दैनिक अतुल्य महाराष्ट्र संपादक नितीन ढाकणे, तरुण भारतचे प्रतिनिधी श्रीराम लांडगे, लक्ष्मण वैराळ सर दिसत आहेत**

# क्रेडाईच्या वतीने कामगार कल्याण सप्ताहाचे आयोजन

## श्रमिक सन्मान - आपले योगदान, आमचा अभिमान अंतर्गत विविध उपक्रम राबविणार - अंबाजोगाई क्रेडाईचे अध्यक्ष संजय सुराणा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

क्रेडाई महाराष्ट्रच्या वतीने बांधकाम कामगारांप्रती कृतज्ञता - २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. श्रमिक सन्मान - आपले योगदान, आमचा अभिमान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. कामगार कल्याण सप्ताह साजरा केला जात आहे. आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून हा उपक्रम राबवला जात असून, यामध्ये बांधकाम कामगारांच्या आरोग्य, सुरक्षा आणि जीवनमानाचा दर्जा उंचावण्यावर भर देण्यात आला आहे. याचा शुभारंभ मंगळवारी करण्यात आला असल्याची माहिती अंबाजोगाई क्रेडाईचे अध्यक्ष संजय सुराणा व सचिव पवन भराडीया यांनी दिली आहे.

मंगळवार, दिनांक ५ मे रोजी क्रेडाई महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई शाखेच्या वतीने कामगार कल्याण सप्ताहास प्रारंभ झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक रचना परदेशी तर प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक बप्पा सिरसाठ (धारूर), शुभम थोरवे (जेएसडब्ल्यु स्टीलचे मराठवाडा विभागीय व्यवस्थापक), धनराज जाधव (कुबेर स्टील डेपोचे प्रमुख व्यवस्थापक), श्रीगोपाल लोहिया (लोहिया स्टील), सुरेश शेळके (चेअरमन, धनलक्ष्मी मल्टिस्टेट, धारूर), ज्येष्ठ समाजसेवक बाबुराव शिनगारे गुरूजी (व्यापारी संघ, धारूर), श्री.कळसकर साहेब (मोजणी अधिकारी), अभय भावठाणकर (उद्योजक), बंडू मुंडे (प्रगतशील शेतकरी), सौ.अनिताताई सुराणा (अध्यक्ष, सेवाभारती शिक्षण संस्था, लातूर) हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी ७० हून अधिक बांधकाम कामगार सहभागी झाले होते.




या सर्व कामगारांना जेएसडब्ल्यु स्टीलकडून टी-शर्ट वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना शुभम थोरवे (जेएसडब्ल्यु स्टीलचे मराठवाडा विभागीय व्यवस्थापक) यांनी सांगितले की, बांधकाम क्षेत्रात सातत्याने नवीन तंत्रज्ञान येत असून गुणवत्तापूर्ण कामासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज वाढत आहे. बांधकाम क्षेत्राचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या कामगारांच्या कौशल्य विकासासाठी क्रेडाई महाराष्ट्रकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. कामगार कल्याण सप्ताहामुळे अंबाजोगाईच्या बांधकाम क्षेत्राला नवी दिशा मिळेल. प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळाची कमतरता दूर होण्यास मदत होईल तसेच कामगारांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर अध्यक्षीय समारोप करताना रचना परदेशी यांनी सांगितले की, अशा उपक्रमांचा उद्देश हा बांधकाम क्षेत्रातील कामगारांना अधिक सक्षम आणि सुरक्षित करणे हा आहे असे सांगून त्यांनी सातत्याने समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल क्रेडाई अंबाजोगाई शाखेचे कौतुक केले. प्रारंभी प्रास्ताविक करताना अंबाजोगाई क्रेडाईचे अध्यक्ष संजय सुराणा यांनी सांगितले की, क्रेडाई महाराष्ट्र यांच्या वतीने कौशल्य विकास आणि कामगार कल्याण समिती तसेच सीएसआर समितीद्वारे बांधकाम कामगारांप्रती कृतज्ञता सप्ताह - २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने साजरा केल्या जाणाऱ्या सप्ताहाच्या निमित्ताने पुढील उपक्रम राबविण्यात येणार आहेत. श्रमिक सन्मान - आपले योगदान, आमचा अभिमान या अंतर्गत १) बीओसीडब्ल्यू नोंदणी मोहीम राबविली जाईल., २) सर्व बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत आरोग्य, नेत्र व दंत तपासणी, तसेच मधुमेह, रक्तदाब, हिमोग्लोबिन, थायरॉईड इत्यादींसारख्या उपयुक्त चाचण्या केल्या जातील., ३) कामगारांमध्ये आर्थिक साक्षरता, सुरक्षित बँकिंग पद्धती, बचतीची सवय, तसेच वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्य जपणुकीचे महत्त्व याविषयी जागृती निर्माण करणे., ४) बांधकाम स्थळांवर पाळल्या जाणाऱ्या सुरक्षा उपाययोजनांच्या महत्त्वाविषयी कामगारांमध्ये जागृती निर्माण करणे आणि त्यांना त्याबाबतचे प्रशिक्षण देणे., ५) कामगारांसाठी कौशल्य विकास कार्यक्रमांचे आयोजन करणे., ६) प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना, जीवनज्योती विमा योजना इत्यादींसारख्या कामगार कल्याणकारी योजनांविषयी माहिती देण्यासाठी विशेष सत्रांचे आयोजन करणे., ७) नोंदणीकृत कामगार आणि गरजू विद्यार्थ्यांना दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे संच (किट्स) व शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे तसेच कामगारांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी कौतुक आणि गौरवपर कार्यक्रमांचे आयोजन करणे आदी विविध उपक्रम राबविण्याचा आमच्याकडून प्रयत्न केला जाणार आहे अशी माहिती अंबाजोगाई क्रेडाईचे अध्यक्ष सुराणा यांनी दिली आहे. उपस्थितांचे आभार बाबुराव शिनगारे गुरूजी यांनी मानले. तर सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अंबाजोगाई क्रेडाईचे सचिव पवन भराडीया, अमोल पवार, राहुल कापसे, कुलदीप परदेशी, खंडू पिसाळ, रवि बिक्कड, सुमित काकडे, संदीप दुगाने, वैभव चाटे, डॉ.संमकीत सुराणा, रब्बानी भाई, अमोल सरवदे आदींनी पुढाकार घेतला होता.